स्विकारल्याचा दिनांक : १६/०३/२०२४
नोंदणी दिनांक : ०४/०४/२०२४
निकालाचा दिनांक : ०५/०५/२०२६
कालावधी : ०२ व., ०१ म., १९ दि.

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.२, माढा यांच्या न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी व्ही.सी.क्षीरसागर)

**भाग 'अ'**

| | |
|---|---|
| | **नियमित फौजदारी खटला क्र.११८/२०२४**<br>**नि.क्र.३०**<br>CNR No.MHSO170010272024 |
| **गुन्ह्याचा तपशिल** | माढा पोलिस ठाणे गुन्हा रजि.क्र.२१४/२०२३,<br>भा.दं.वि.कलम ३५४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे |
| **अभियोग पक्ष** | महाराष्ट्र शासन तर्फे– पोलीस ठाणे अंमलदार,<br>माढा पोलीस ठाणे, जि. सोलापूर |
| **तर्फे प्रतिनिधी** | सरकारी अभियोक्ता श्री. ए. पी. काळे |
| **आरोपी** | १. दत्तात्रय दामू जाधव, वय – ५७ वर्षे, व्यवसाय – मजूरी |
| | २. खंडू दत्तात्रय जाधव, वय – ३१ वर्षे, व्यवसाय – मजूरी |
| | ३. शंकर दत्तात्रय जाधव, वय – २६ वर्षे, व्यवसाय – मजूरी<br>सर्व रा. अंजनगाव बु., ता. माढा, जि. सोलापूर |
| **आरोपींतर्फे प्रतिनिधी** | विधिज्ञ श्री. एम. एस. लोंढे |

**भाग 'ब'**

| **गुन्ह्याचा तपशिल** | | |
|---|---|---|
| गुन्ह्याची तारीख | : | दि.२८/०९/२०२३ |
| प्रथम खबरी अहवाल तारीख | : | दि.२९/०९/२०२३ |

| | | |
|---|---|---|
| दोषारोपपत्र दाखल तारीख | : | दि.१३/०३/२०२४ |
| दोषारोप निश्चित तारीख | : | दि.१४/०२/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | : | दि.२३/०४/२०२६ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | : | -- |
| न्यायनिर्णयाची तारीख | : | दि.०५/०५/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | : | -- |

| आरोपींचा तपशिल | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **आरोपी क्र.** | **आरोपीचे नाव** | **अटक तारीख** | **जामीन तारीख** | **दोषारोप ठेवलेले अपराध** | **निर्दोष सोडले किंवा शिक्षा दिली** | **शिक्षेचे स्वरुप** | **फौ.प्र.सं.कलम ४२८ करीता संपरिक्षे दरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी** |
| १ ते ३ | वरील प्रमाणे | फौ.प्र.सं.कलम ४१(अ)(१) प्रमाणे नोटीस | – | भादंवि कलम ३५४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे | निर्दोष | – | – |

## भाग 'क'

## सरकारी/बचाव/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

### अ. सरकारी

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | निर्भया | फिर्यादी | २५ |
| २. | फिर्यादीचे पती | साक्षीदार | २८ |

### ब. बचावाचे साक्षीदार

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| | नाही | | |

**क. न्यायालयीन साक्षीदार**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | नाही | – | – |

**सरकारी/बचाव/न्यायालयीन कागदोपत्री निशाणांची यादी**

**अ. सरकारी**

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | २७ | फिर्यादीचा फौ.प्र.सं.कलम १६४–५ अन्वये नोंदविलेला जबाब |
| २. | २९ | घटनास्थळ पंचनामा |

**ब. बचाव**

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| **१.** | – | – |

**क. न्यायालयीन निशाण्या**

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| **१.** | – | – |

**मुद्देमाल**

| क्रमांक | मुद्देमाल वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | – | – |

## न्या य नि र्ण य
## (घोषित दिनांक ०५ मे, २०२६)

प्रस्तुत प्रकरणामध्ये आरोपी क्र.२ विरुद्ध भा.दं.वि कलम ३५४ व आरोपींविरुद्ध भा.दं.वि कलम ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ या गुन्हयासाठी खटला चालविण्यात आला. फिर्यादीचे नाव गोपनीय राखण्याकरिता तिच्या नावाचा उल्लेख 'निर्भया' असा करण्यात आला आहे.

### अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे

२. दि.२८/०९/२०२३ रोजी रात्री ८.०० वा. फिर्यादी निर्भया ही तिची सासू–सासरे लक्ष्मी मंदीराचे चावडीत बसले होते. ती त्यांना जेवण देण्याकरिता गेली असता दत्ता दाम जाधव हा आला व त्याने तिला 'तु तुझ्या सासू–सास–याचे जेवण सार्वजनिक चावडीत का आणली.' असे म्हणून शिवीगाळ केली. दत्ता याने त्याच्या मुलांना आवाज देऊन त्यांच्या घरासमोर बोलावून घेतले. त्याची मुले खंडू दत्ता जाधव व शंकर दत्ता जाधव हे तेथे आले. दत्ताने तिचे केस धरुन तिला उभे केले असता शंकर जाधव याने देखील हाताने, लाथाबुक्क्याने मारहाण केली. खंडू याने शिवीगाळ करुन हाताने मारहाण करुन तिच्या अंगाशी झोंबाझोंबी करुन तिची छाती दाबली. त्यामुळे तिच्या मनास लज्ज्ञा वाटली. त्यानंतर तिने आरडाओरडा केला असता तिचे पती तेथे आले. त्यांनी सोडवणूक केली. त्यानंतर तिघे आरोपी तिला शिवीगाळ करत निघून गेले. त्यानंतर फिर्यादीने माढा पोलिस स्टेशन येथे आरोपींविरुध्द फिर्याद दाखल केली.

३. सदर फिर्यादवरुन माढा पोलिस स्टेशन येथे आरोपींविरुध्द गुन्हा रजि. क्र.२१४/२०२३ भादंवि कलम ३५४, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये नोंदविण्यात

आला. सदर गुन्हयाचे तपास काम ग्रे. पोसई आर. व्ही. हांडे यांनी केला. त्यांनी तपासाअंती न्यायालयामध्ये आरोपींविरुध्द भा.दं.वि कलम ३५४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपी क्र.२ विरुद्ध भा.दं.वि कलम ३५४ व आरोपींविरुद्ध भा.दं.वि कलम ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये नि.क्र.१२ वर दोषारोप ठेवण्यात आले. आरोपींनी सदर दोषारोप वाचून व समजावून सांगितला असता त्याने नि.क्र.१३ ते १५ वर सदर दोषारोप नाकारला व संपरिक्षेची मागणी केली. अभियोगपक्षाच्या साक्षी दरम्यान आरोपींनी घटनास्थळ पंचनामा निशाणी क्र.२९ मान्य व कबूल केले. आरोपींविरूध्द आक्षेपार्ह मजकूर न आल्याने आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) प्रमाणे निवेदन नोंदविण्यात आले नाही. आरोपींनी बचावाप्रित्यर्थ कोणताही पुरावा दिलेला नाही.

५. अभियोगपक्षाचा साक्षीपुरावा पाहता आणि सहाय्यक सरकारी वकिल श्री. ए. पी. काळे व आरोपींतर्फे वकिल श्री. एम. एस. लोंढे यांचा युक्तीवाद ऐकून खालील मुद्दे माझ्या विचाराधीन निघत असून, त्यावरील निष्कर्ष कारणमीमांसेसह देत आहे.

| अ.नु. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय की, दि.२८/०९/२०२३ रोजी रात्री ८.३० वा. सुमारास मौजे उपळाई बु., ता. माढा, जि. सोलापूर येथील मातंग समाजाचे मंदीरासमोर आरोपी क्र.२ याने फिर्यादीच्या अंगाशी झोंबाझोंबी करुन तिची छाती दाबून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केला? | नाही |

| | | |
|---|---|---|
| २ | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की, वरील तारीख, वेळी व ठिकाणी सर्व आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीस हाताने तसेच लाथाबुक्क्याने मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत केली ? | नाही |
| ३ | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की, वरील तारीख,वेळी व ठिकाणी सर्व आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीस शिवीगाळ करुन त्यांचा उददेशपुर्वक अपमान केला, ज्यामुळे त्यांच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य कोणताही अपराध घडावा यासाठी त्यांना प्रक्षोभित केले ? | नाही |
| ४ | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की, वरील तारीख, वेळी व ठिकाणी सर्व आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीस फौजदारी पात्र धकदपटशा करुन दमदाटी केली ? | नाही |
| ५ | काय आदेश? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमीमांसा

### मुद्या क्र.१ ते ४ करिता

६. मुद्ये क्र. १ ते ४ एकमेकांशी संलग्न असल्याने ते चर्चेकरिता एकत्रीत घेण्यात आलेली आहेत.

७. अभियोगपक्षाचे केस नुसार दि.२८/०९/२०२३ रोजी रात्री ८.३० वा. सुमारास मौजे उपळाई बु., ता. माढा, जि. सोलापूर येथील मातंग समाजाचे मंदीरासमोर आरोपी क्र.२ याने फिर्यादीच्या अंगाशी झोंबाझोंबी करुन तिची छाती दाबून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केला तसेच आरोपींनी संगनमताने फिर्यादीस हाताने व लाथाबुक्क्याने मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत केली तसेच शिवीगाळ करुन दमदाटी केली, हे सिध्द करणे गरजेचे

आहे. आरोपीवरील सदर दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने सादर करण्यात आलेल्या पुराव्याचे ऊहापोह करणे गरजेचे आहे.

८. अभियोगपक्षातर्फे आरोपीवरील दोषारोप सिध्द करण्यासाठी एकूण दोन साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली आहे. अभियोगपक्षाचे मुख्य साक्षीदार सा.क्र.१ फिर्यादी निर्भयाने तिच्या साक्षीमध्ये तिचेमध्ये व आरोपींमध्ये किरकोळ वाद झाल्याने तिने आरोपींविरुध्द गैरसमजूतीने फिर्याद दाखल केली असल्याचे कथन करुन तिने दि.२८/०९/२०२३ रोजी रात्री ८.३० वा. सुमारास लक्ष्मी मंदीराच्या चावडीसमोर फिर्यादीने तिचे फिर्यादीचे आई–वडीलांना जेवण घेऊन गेली असताना आरोपी दत्ता जाधव याने तिला 'तू येथे का आली' असे म्हणून शिवीगाळ केल्याचे तसेच त्याने तिचे केस धरुन लाथाबुक्क्याने मारहाण केल्याचे नाकारले आहे. तिने दत्ता जाधव यांचा मोठा मुलगा खंडू याने तिला शिवीगाळ करुन हाताने मारहाण करुन तिच्या अंगाशी झोंबाझोंबी करुन तिची छाती दाबून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केल्याचे नाकारले आहे. तिने तिच्या फौ.प्र.सं.कलम १६४/५ अन्वये नोंदविलेल्या जबाबातील मजकूर तिला आठवत नसल्याचे कथन केले आहे. अभियोगपक्षातर्फे विचारण्यात आलेल्या उत्तर सुचक प्रश्नांना तिने नकारार्थी उत्तरे देऊन तिने तिच्या फिर्यादतील मजकूर नाकारला आहे.

९. सा.क्र.२ फिर्यादीचे पती यांनी त्यांच्या साक्षीमध्ये त्यांची पत्नी फिर्यादी व आरोपींमध्ये किरकोळ वाद झाल्याने तिने आरोपींविरुध्द गैरसमजूतीने फिर्याद दाखल केल्याचे कथन केले आहे. त्यांनी त्यांच्या साक्षीमध्ये दि.२८/०९/२०२३ रोजी रात्री ८.३० वा. सुमारास लक्ष्मी मंदीराच्या चावडीसमोर फिर्यादीने तिचे फिर्यादीचे आई–वडीलांना जेवण घेऊन गेली असताना आरोपी दत्ता जाधव याने तिला 'तू येथे का आली' असे म्हणून शिवीगाळ केल्याचे तसेच त्याने तिचे केस धरुन लाथाबुक्क्याने मारहाण केल्याचे नाकारले आहे. त्यांनी दत्ता जाधव यांचा मोठा मुलगा खंडू याने तिला शिवीगाळ करुन हाताने मारहाण करुन तिच्या अंगाशी झोंबाझोंबी करुन तिची छाती दाबून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले, हे नाकारले आहे. अभियोगपक्षातर्फे विचारण्यात आलेल्या उत्तर सुचक प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तरे देऊन त्यांच्या जबाबामधील मजकूर नाकारला आहे.

१०. अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले असता अभियोगपक्षाची मुख्य साक्षीदार फिर्यादी निर्भया हिने आरोपींविरुध्द काहीही कथन केले नसल्याचे दिसून येते. फिर्यादीने तिच्या फिर्यादमधील मजकूर नाकारला आहे. त्यामुळे मुळात फिर्याद सिध्द होत नाही. तसेच सा.क्र.२ फिर्यादीचे पती असून त्यांनी अभियोगपक्षास सहकार्य केले नसल्याचे दिसून येते. त्यांनी आरोपींविरुध्द काहीही कथन केले नाही. फिर्यादीने तिच्या व आरोपींमध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे व आरोपींविरुध्द तिची काहीही तक्रार नसून, प्रकरण पुढे चालवायची नाही असे कथन केले आहे. अभिलेखावरील एकाही साक्षीदाराने आरोपींविरुध्द काहीही कथन केले नसल्याचे दिसून येते. फिर्यादी व आरोपी यांचे दरम्यान आपसात तडजोड झाली असल्याने सदर केससंदर्भात आणखी विवेचन करणे योग्य नाही.

११. आरोपीच्या वकीलांनी घटनास्थळ पंचनामा मान्य व कबूल केले असले तरी फिर्यादीने आरोपींविरुध्द काहीही कथन न केल्याने घटनास्थळ पंचनाम्याचा उपयोग अभियोगपक्षास होत नाही. त्यामुळे प्रस्तुत गुन्हयाशी आरोपींचा संबंध आहे हे सिध्द होत नाही. फिर्यादीने आरोपींविरुध्द काहीही कथन न केल्याने आरोपींनी दोषारोपात नमूद अपराध केले ही बाब पुर्ण संशयापलीकडे शाबीत होत नाही.

१२. **मदन मोहन अबीट वि.स्टेट ऑफ पंजाब, ए.आय.आर २००८ सुप्रिम कोर्ट १९६९** या न्यायानिर्णयामध्ये मा.सर्वाच्च न्यायालयाने विषद केले आहे की, 'फौजदारी वाद आपसात मिटला असेल तर न्यायालयाने विनाकारण वेळ खर्च करणे उचित नाही. सबब, पुढील विस्तृत चर्चा न करता इतकेच विषद करावे लागेल की, आरोपींनी दोषारोपात नमूद अपराध केले ही बाब पुर्ण संशयापलीकडे शाबीत होत नाही' सदर केसमध्ये फिर्यादी व साक्षीदारने त्यांच्या उलटतपासामध्ये दिलेले कथन हे फिर्यादमधील कथनांशी विसंगत आहे. फिर्यादी व आरोपी यांच्यात आपसात तडजोड झाली असल्यामुळे फिर्यादी व साक्षीदार यांनी अशी भूमिका घेतली आहे. त्यामुळे त्यांच्याविरुध्द खोटा पुरावा दिल्याबाबत कार्यवाही करणे योग्य वाटत नाही.

१३. वरील चर्चेवरुन सदर तथाकथित घटनेवेळी दि.२८/०९/२०२३ रोजी रात्री ८.३० वा. सुमारास मौजे उपळाई बु., ता. माढा, जि. सोलापूर येथील मातंग समाजाचे

मंदीरासमोर आरोपी क्र.३ याने फिर्यादीच्या अंगाशी झोंबाझोंबी करुन तिची छाती दाबून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केला तसेच आरोपींनी संगनमताने फिर्यादीस हाताने व लाथाबुक्क्याने मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत केली तसेच शिवीगाळ करुन दमदाटी केली, हे सिद्ध झालेले नसल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे आरोपी क्र.२ याने भा.दं.वि कलम ३५४ व सर्व आरोपींनी भा.दं.वि कलम ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला, हे निसंशय सिद्ध होत नाही. आरोपींविरुध्दचा दोषारोप निसंशयपणे सिध्द होईपर्यत आरोपी निर्दोष आहे हे फौजदारी कायद्याचे मुळ गृहीतक आहे. एकंदरीत आरोपींविरुध्दचा दोषारोप निसंशयपणे सिध्द होत नाही व संशयाचा फायदा आरोपींना जातो. त्यामुळे मुद्या क्र.१ ते ४ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे. मुद्या क्र.५ साठी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## **आदेश**

| | |
|---|---|
| १. | आरोपी क्र.२ खंडू दत्तात्रय जाधव याची भा.दं.वि कलम ३५४ तसेच आरोपी क्र.१ दत्तात्रय दामू जाधव, क्र.२ खंडू दत्तात्रय जाधव व क्र.३ शंकर दत्तात्रय जाधव यांची भा.दं.वि कलम ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ या गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहिता २४८(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते. |
| २. | आरोपींचे वैयक्तिक बंधपत्र व पुर्वी दिलेला जामीन रद्द करण्यात येत आहे. |
| ३. | आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७(अ) प्रमाणे अपील कालावधीकरिता प्रत्येकी रक्कम रु.१५,०००/– चे वैयक्तिक बंधपत्र व जातमुचलका दयावे. |
| ४. | सदर न्यायनिर्णयाची प्रत मा. जिल्हादंडाधिकारी, सोलापूर यांना फौ.प्र.सं. कलम ३६५ प्रमाणे पाठविण्यात यावे. |

(न्यायनिर्णय खुल्या न्यायासनावर निवेदित व घोषीत)

VAIBHAVI CHANDRAHAR KSHIRSAGAR
Digitally signed by VAIBHAVI CHANDRAHAR KSHIRSAGAR
Date: 2026.05.05 17:49:31 +0530

(व्ही.सी.क्षीरसागर)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.२, माढा

दि.०५/०५/२०२६

| **CERTIFICATE** | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. file Order are same word for word as per original Order. | | |
| Name of Stenographer | : | N. B. Kamurti |
| Court Name | : | Smt. V.C. Kshirsagar<br>2nd Jt.CJJD & JMFC, Madha |
| Date of Order/Judgment | : | 05/05/2026 |
| Order/judgment signed by presiding officer on | : | 05/05/2026 |
| Order/judgment uploaded on | : | 05/05/2026 |